# कर बचतीचा उत्कृष्ट पर्याय

अनिल पाटील-असो फायनान्सियल प्लॅनर




आपल्या उत्पन्नातून आयकराचे नियोजन करणे हे फायद्याचे व आव्हानात्मक असू शकते. प्रथम तूम्ही आपले उत्पन्न किती आहे ते पाहिले व खालील स्लॅब नूसार किती आयकर बसू शकेल याचा अंदाज घेवून ॲडव्हान्स टॅक्स भरण्याचे नियोजन करू शकता. मात्र ८० सी कलमाखाली आपणास १५०००० पर्यत गुंतवणूक केलेल्या रक्कम ही वजावटीस पात्र ठरते. मात्र या ८० सी कलमाखाली अनेक योजना उपलब्ध आहेत. मग अशा करबचतीच्या फायदयासाठी तुम्ही तुमच्या गरजेनुसार करबचतीचे सर्व्वोत्तम पर्याय निवडू शकता व हे काम आव्हानात्मक यासाठी आहे. जर तुम्ही अयोग्य पर्याय निवडण्यास किमान ३ ते ५ वर्षासाठी अयोग्य गुंतवणूक होवू शकते. म्हणूनच दी इकोनॉमीक्स टाईम्स यांच्या वेल्थ या टीम कडून नुकताच एक सर्व योजनांचा सर्व्हे करुन त्याचा स्टार रेटीग दिले आहे. यांच्या रेटींगनुसार बचतीचे सर्व्वोत्तम पर्याय निवड करण्यास फार चांगली मदत होते. त्यानी दिलेल्या आर्थिक परतावानुसार या योजनांची उपयुक्तता सिध्द करू शकतात. गुंतवणूकीच्या पर्यायाचे मूल्यमापन हे ७ घटकांवरुन केले जाते - परतावा, सुरक्षिताना, लवचिकता/ परिवर्तनशीलता, तरलता, खर्च, पारदर्शकता आणि करपात्रतेचे उत्पन्न. प्रत्येक घटकाला समान महत्त्व आहे आणि वेगवेळ्या करबचतीच्या पर्यायांवर संयुक्त प्राप्तांक काम करतो. तुमच्या गरजेनुसार व आर्थिक उद्देशानुसार तुम्ही पर्याय निवडू शकता.

**आयकर दर खालील प्रमाणे**

० ते २५०००० कर ०

२५०००० ते ५००००० - १०%

५००००० ते १००००००- २०%

१०००००० पुढे -३०%

वेल्थ मूल्यांकनाचा करदात्याला त्याच्या वेगवेगळ्या परिस्थितीनुसार व जीवन स्थितीनुसार गुंतवणूकीसाठी मदत होईल.

वेल्थ मूल्यांकन

| से. ८० सी | मूल्यांकन |
|---|---|
| इ एल एस एस | ***** |
| यूलीप | **** |
| एन पी एस | **** |
| पी पी एफ आणि व्ही पी एफ | **** |
| सुकन्या समृध्दी योजना | *** |
| जेष्ठ नागरिक योजना | *** |
| बॅक एफ डी आणि एन एस सी | ** |
| पेन्शन योजना | ** |
| आयुर्विमा पॉलिसी | * |
| सर्वोत्कृष्ट | ***** |
| उत्तम | **** |
| समाधानकारक | *** |
| सर्वसाधारण | ** |
| असमाधान कारक | * |

**१) इ एल एस एस फंड** *****

इक्वीटी लिंकड सेव्हींग्ज स्कीम ही म्युच्यूअल फंडातील योजना आहे या योजनेद्वारे जमा रक्कम ही फंड मॅनेजरच्या तज्ञ व्यवस्थापकाकडून निरनिराळ्या कंपन्याचा शेअर्स गुंतविण्यात येते हे या इक्विटी फंडातील गुंतवणूक तीन वर्षासाठी मूदतबंद

असते. या योजनेमधील गुंतवलेल्या कोणतेही रक्कम कपात केली जात नाही. या योजनेमध्ये जास्त परतावा, पारदर्शकता व अवघ्या तीन वर्षानंतर तरलता या वैशिष्ट्यांमुळे मूल्यांकनामध्ये अव्वल स्थानावर आहे. मागील ३ वर्षापासून सरासरी १७.८% परतावा प्राप्त झाला. व ज्यानी १५ किंवा २० वर्षापासून अशा योजनेमध्ये सातत्याने रक्कम गुंतवीले आहे अशा लोकानाही १५ ते १८% परतावा मिळाला आहे यामुळे ही योजना लोकप्रीय झाले आहेत.

### २) यूलीप ****

यूलीप ही योजना लाईफ इन्शूरन्स कंपन्याच्या वतीने दिल्या जातात. आयूविमा व गुंतवणूक असे दूहेरी फायदा असलेली योजना मात्र विमेदारानी गुंतविलेल्या रकमेतून या कंपन्याचे व्यवस्थापन खर्च वजा करुन बाकीचे रक्कम शेअर्स मार्केटमध्ये गुंतविली जाते. सदर योजनेला वेल्थ टीमने दुसऱ्या क्रमांकावरील रेटीग दिली आहे. ही योजनातील गुंतवणूक पाच वर्षासाठी मूदतबंद असते. अशा योजनामधील गुंतवणूकीवर मागील ५ वर्षापासून सरासरी ९.८% परतावा मिळाला.

### ३) एन पी एस ****

नॅशनल पेन्शन स्कीम हा करबचतीचा आकर्षक पर्याय आहे. यामध्ये रु. ५०००० चा अधिक करकपात ची सुविधा उपलब्ध आहे. यामधील गुंतवणूक ही कर्जरोखे व शेअर बाजारामध्ये तज्ञाकडून गुंतविली जाते इतर योजनेच्या मानाने या योजनेचा सर्वात कमी खर्च हा व्यवस्थापनेचा आहे आपल्या रिटायमेंटसाठी फार चांगला पर्याय आहे. मागील ३ वर्षापासून सरासरी ९.५% परतावा.

### ४) पी पी एफ आणि व्ही पी एफ () ****

पब्लीक प्राव्हीडंड फंड व एप्लॉयमेंट प्राव्हीडंड फंड आपल्या भारतामध्ये सर्वात लोकप्रिय योजना १५ वर्षे मुदतीचे कीतीही रक्कम गुंतविता येते. १५ वर्षानंतर करमूक्त मिळणारी करबचतीसाठी सूरक्षित योजना होय मागील ३ वर्षापासून सरासरी ८.७% परतावा. पुराणमतवादी गुंतवणूकदारासाठी हा एक चांगला पर्याय राहतो. ज्याला कमी परतावा पण परताव्याची खात्री असते.

### ५) सुकन्या समृद्धी योजना ***

केंद्र सरकारने पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून लहान मुलीच्या शिक्षणासाठी तरतूद सर्वसामान्य लोकांना करता यावी यासाठी सुरू केली आहे १० वर्षाच्या आतील मुलीच्या नावे ही योजना सुरू करु शकतो. ही योजना परतावा (२०१५-१६) ९.२% करबचतीसाठी एक चांगला मार्ग आहे. पी पी एफ च्या ऐवजी सुकन्या समृद्धी योजनेमध्ये गुंतवणूक केल्यास ५० पैसे जास्त कमवू शकता.

### ६) जेष्ठ नागरिक बचत योजना ***

परतावा (२०१५-१६) ९.३%

ही पोस्टाची योजना निवृत्तधारकांसाठी आहे. पाच वर्षाच्या मुदतीसाठी व करबचतीचा उत्कृष्ट पर्याय आहे. या योजनेची मुदत ५ वर्षासाठीची आहे व फक्त ६० वर्षावरील नागरिकांसाठी आहे. परंतू नोकरीमधून निवृत झालेल्या व्यक्तीसाठी ५८ वयामध्ये ही गुंतवणूक करता येतो.

### ७) बॅ एफ डी आणि एन एस सी

परतावा (२०१५-१६) ८-८.२५%

बॅक एफ डी आणि एन एस सी अतिसुरक्षित व खात्रीशीर परतावा देतात व सोपे साधन असून कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकामध्ये मुदतबंद ठेववर करसवलत घेवू शकतो एनएससी मध्ये सहा वर्षासाठी गुंतवणूक करपात्र मिळते. पण ठेवीवरील व्याज पूर्णपणे करपात्र आहे.

### ८) आयुर्विमा पॉलिसी *

परतावा २० वर्षे योजनेसाठी ५-५.६%

पारंपारिक जीवनविमा पॉलिसी मधील गुंतवणूक कर बचतीसाठी फायदा घेता येतो. या पारंपारिक जीवनविमा पॉलिसीमध्ये आपला विमा संरक्षण व गुंतवणूक या उद्देशाने या योजना स्विकारल्या जातात. ही गुंतवणूक सरकारच्या निरनिराळ्या रोख्यामध्ये केले जाते. ही गुंतवणूक संरक्षित मानली जाते. मात्र दिर्घकालीन परतावा विचार केलातर खूपच कमी परतावाया योजनेतून मिळताना दिसतात.

वरील प्रमाणे अनेक योजना ८० सी खाली उपलब्ध आहेत काही योजना १७ ते १८% परतावा दिले आहेत व काही योजना ५ ते ६% परतावा देत आहेत या फरकानुसार दिर्घकालीन गुंतवणूकीवर फार मोठा फरक पडू शकतो. यासाठी विमा संरक्षण व गुंतवणूक वेगवेगळे करणेचे फायदेशीर ठरते. मात्र आपली आर्थिक गरज निश्चित करुन व ही गरज किती वेळेनंतर येणार आहे व जोखीम किती घेवू शकतो यानुसार आपल्या आर्थिक सल्लागाराच्या सल्यानुसार करसवलत व गुंतवणूकीचे नियोजन करावे.